“सोलापूर जिल्हयातील सहकार चळवळ : एक ऐतिहासीक अभ्यास.”

(इ.स. १९६० ते इ.स.२०००)

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,

विष्णुपुरी, नांदेड.

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील इतिहास विषयातील पीएच.डी

पदवीसाठी सादर करण्यात येणारा संशोधन आराखडा

संशोधक विद्यार्थी

श्री. पांढरे शैलेंद्र विठ्ठलराव

एम.ए.बीएड.

दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ. गंगथडे रमेश दत्तात्रय

एम.ए.बीएड, एम फील,पी एच डी.

इतिहास विभाग प्रमुख

के.टी.पी. महाविद्यालय, हडोळती,

ता. अहमदपूर, जिल्हा लातूर.

इतिहास विभाग

ऑगस्ट २०१६

“सोलापूर जिल्हयातील सहकार चळवळ : एक ऐतिहासीक अभ्यास.” (इ.स. १९६० ते इ.स.२०००)

१. प्रस्तावना :—

सहकार ही संकल्पना मानवाच्या सहजीवनातून उदयास आली आहे. सहकाराची कल्पना भारतात प्राचीन काळापासून चालू आहे. मात्र आधुनिक अर्थाने सहकारी चळवळीचा उगम १९ व्या शतकात युरोपमध्ये झाला. युरोपमधील औद्योगिक क्रांतीनंतर सहकार या संकल्पनेकडे व्यापक दृष्टीकोनातून पाहिले जाऊ लागले. औद्योगिक क्रांती व यंत्राचा वाढता वापर यामुळे समाजात आमूलाग्र बदल झाला. समाजात भांडवलदार व मजूर असे दोन वर्ग निर्माण झाले. कामगारांना अधिक चांगले जीवन जगण्यासाठी खऱ्या अर्थाने सहकाराची सुरूवात इंग्लंडमध्ये इ.स. १८४४ मध्ये रॉबर्ट ओवेन या परोपकारी सद्‌गृहस्थाने केली. म्हणून रॉबर्ट ओवेन हा सहकारी चळवळीचा जनक मानला जातो. इंग्लंडमधील रॉश्डेल खेडयातील टोंडसेन गल्लीतील २८ विणकरांनी जीवनावश्यक वस्तू स्वस्त किंमतीला उपलब्ध व्हाव्यात म्हणून इ.स. २१ डिसेंबर १८४४ मध्ये “इक्विटेबल पायोनिअर्स को. ऑपरेटिव्ह सोसायटीची” स्थापना केली. या संस्थेमुळे जगातील आधुनिक सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली.

भारतात ब्रिटीश सरकारच्या पुढाकारातून सहकारी संस्थांची स्थापना झाली. ब्रिटीश सरकारला अशा चळवळीची आवश्यकता भासण्याचे कारण म्हणजे भारतात एकोणीसाव्या शतकाअखेर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. यावेळी मुंबई प्रांतातील ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर दंगे, जाळपोळ व लुटालूट होवू लागली. राजकीय स्थैर्याच्या दृष्टीने ब्रिटीश राजवटीला असे उठाव परवडण्यासारखे नव्हते म्हणूनच या उठावाची सरकारने गंभीर दखल घेतली व सावकारशाहीला पर्याय म्हणून सहकारी संस्था स्थापन कराव्यात अशी कल्पना पुढे आली आणि ग. ज. लॉर्ड कर्झन याने इ.स. १९०४ मध्ये सहकारी कायदा मंजूर केला. इ.स. १९०४ च्या सहकारी संस्था कायद्याच्या संमतीनंतर भारतात सहकारी चळवळ सुरू झाली.

सोलापूर हे महाराष्ट्र राज्यातील महत्त्वाचे असे जिल्हयाचे ठिकाण आहे. स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारतात कृषि विकास, औद्योगिक विकास आणि शैक्षणिक विकासासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून व सहकारी चळवळीच्या माध्यमातून स्थानिक भागाच्या विकासास सुरूवात झाली. अत्यंत कमी पाऊस पडत असलेल्या या क्षेत्रामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात पारंपारिक पध्दतीने शेती व उद्योग केले जात होते. येथे मुख्यत: ज्वारी, बाजरी, गहू, मका, मटकी, तूर यासारखी पिके घेतली जात होती. मात्र स्वातंत्र्योत्तर काळानंतर व सहकारी चळवळीच्या विकासानंतर या पीक पध्दतीत मोठया प्रमाणात बदल होऊन ऊस, कापूस, केळी, डाळींब, बोर, द्राक्षे यासारखी नगदी पिके घेतली जाऊ लागली आहेत. या पीक पध्दतीमुळेच सहकारी चळवळीच्या माध्यमातून विविध सहकारी संस्थांची स्थापना झाली आहे.

सहकारी चळवळ ही केवळ शेतकऱ्यांच्या कर्ज पुरवठयाचे एक साधन म्हणून जरी सुरू झाली असली तरी आज तिने मानवी जीवनाच्या सर्व अंगात प्रवेश केलेला आहे. या चळवळीचा या जिल्हयाच्या दृष्टीने विचार केला असता असे दिसून येईल की, सहकारी सोसायटयांच्या अस्तित्वाचा कायदा इ.स. १९०४ साली करण्यात आला व त्यानंतर एकाच वर्षात या जिल्हयात सहकारी चळवळीचे बीजारोपण झाले. इ.स. १९०५ सली बार्शी तालुक्यात 'तडवळे' या गावी पहिली सहकारी सोसायटी स्थापन झाली. नंतर इ.स. १९०६ साली बार्शी सेंट्रल को.बॅक लि. ही मध्यवर्ती संस्था रामचंद्र मोरेश्वर साने यांच्या प्रयत्नाने स्थापन झाली. याशिवाय जिल्हयात पंढरपूर येथे दि पंढरपूर अर्बन को.ऑप. बॅक लि., पंढरपूर या बॅकेची स्थापना इ.स. १९१२ साली झाली. इ.स. १९१८ मध्ये सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेची स्थापना झाली. श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि., गुरसाळे, ता. पंढरपूर या साखर कारखान्याची स्थापना इ.स. १९७८ रोजी झाली. २८ जाने. १९८० रोजी शेतकरी सहकारी सूतगिरणी लि., सांगोला, याशिवाय अनेक सहकारी साखर कारखाने, सहकारी खरेदी—विक्री संस्था, पतसंस्था, औद्योगिक सहकारी संस्था, सहकारी दूध संस्था इत्यादी सहकारी संस्थांचे जाळे जिल्हयात निर्माण झाले आहे. या विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून सोलापूर जिल्हयाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीमध्ये आमूलाग्र बदल झालेला आहे.

दारिद्रय व बेकारी निर्मूलनासाठी सहकारी चळवळीची भूमिका महत्त्वाची आहे. दारिद्रय व बेकारी या दोन्ही समस्या आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टीकोनातून हानीकारक असतात. सामाजिक विषमता वाढीस लागते. म्हणूनच ही सामाजिक विषमता दूर करण्यासाठी, बेरोजगाराची समस्या सोडविण्यासाठी सहकारी चळवळीची सुरूवात झालेली आहे.

२. विषय निवडीचे महत्त्व :—

सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीचे योगदान फक्त आर्थिक क्षेत्रापुरतेच मर्यादित नाही तर ते सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक व शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात या चळवळीचे योगदान अनन्य साधारण आहे. सामाजिक क्षेत्राचा विचार करता स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच समाजातील विविध जाती धर्माच्या तरूणांनी कोणताही धर्म, जात यांचे बंधन न ठेवता एकत्र येऊन ही चळवळ सुरू केली. परिणामी सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात विविध शाळा व महाविद्यालये सुरू केले. कृषि क्षेत्रातही येथील सरकाराने भरीव असे कार्य केले आहे. सोलापूर जिल्हयातील ही सहकारी चळवळ स्वातंत्र्योत्तर काळात फोफावत जाऊन इ.स. १९८० नंतरच्या कालखंडात परमोच्च बिंदूवर पोहोचली. येथील सहकारी चळवळीमुळे जिल्हयाचे नाव राज्य, देश व परदेशापर्यंत जाऊन पोहोचले. कारण जिल्हयातील सहकार क्षेत्र बॅका, पतसंस्था, साखर कारखाने, दुग्धव्यवसाय इत्यादी लहानमोठया उद्योगापर्यंत सर्वच क्षेत्रात विस्तारीत गेले. या सहकाराचा जिल्हयातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रभाव काय होता. तसेच चळवळीचा परमोच्च बिंदू व ऱ्हासाकडे झालेली वाटचाल या सर्वांचा चिकित्सक अभ्यास होणे गरजेचे आहे. आजपर्यंत अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र व वाणिज्यशास्त्र अशा विविध शाखा व विषयातून सोलापूर जिल्हयातील सहकारावर संशोधन झालेले आहे. मात्र ऐतिहासिक दृष्टिकोनातून सहकार चळवळीचा अभ्यास झालेला नाही. असे वाटल्यावरून संशोधकाने हा विषय निवडला आहे.

३. संशोधनाची उद्दिष्टे :—

सदरचे संशोधन कार्य करीत असताना खालील उद्दिष्टे समोर ठेऊन विषयाची मांडणी करण्यात येणार आहे.

१) सहकार चळवळीच्या इतिहासाचा अभ्यास करणे.

२) सोलापूर जिल्हयाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

३) इ.स. १९६० ते इ.स. २००० या कालखंडातील सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीचा विस्तार अभ्यासणे.

४) सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीस लाभलेल्या स्थानिक नेतृत्वाचा अभ्यास करणे.

५) सोलापूर जिल्हयाच्या सामाजिक व आर्थिक विकासात सहकारी संस्थांच्या भूमिकांचा अभ्यास करणे.

६) सहकारी चळवळीच्या विकासातील अडचणी किंवा उणीवांचा अभ्यास करणे.

७) सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीचा टिकात्मक अभ्यास करणे.

४. गृहीतके :—

१) सोलापूर जिल्हयास ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे.

२) सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीमुळे जिल्हयाच्या विकासाला प्रोत्साहन मिळाले आहे.

३) सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीमुळे जिल्हयाचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास झाला आहे.

४) येथील सहकारी चळवळीमुळे स्थानिक नेतृत्व निर्माण होण्यास मदत झाली आहे.

५) येथील सहकारी चळवळीमुळे लोकांना उत्पादनाची साधने मिळाली आहेत.

६) या चळवळीमुळे येथील लोकांचे स्थानिक रोजगार मिळाल्याने मोठया शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होण्यास मदत झाली आहे.

५. संशोधन पध्दती :—

सामाजीक शास्त्रातील संशोधनाकरीता आपण कोणती संशोधन पद्धती वापरावयाची हे संशोधनासाठी निवडलेल्या विषयानुसार ठरवावयाचे असते. इतिहास संशोधनात सर्वेक्षणात्मक पद्धत, प्रश्नावली, प्रत्यक्ष मुलाखत पध्दतीचा वापर करून सदर प्रबंधाचे लेखन हे मुख्यत्वे प्राथमिक साधनांच्या आधारावर करण्यात येणार आहे. तसेच दुय्यम साधनांचा देखील वापर केला जाईल. ऐतिहासिक संशोधन पध्दतीबरोबर सर्वेक्षण पध्दती देखील वापरली जाणार आहे. या सर्वेक्षणामध्ये प्रश्नावली व मुलाखती यांचा वापर केला जाणार आहे. अप्रकाशित व प्रकाशित प्राथमिक आणि दुय्यम संदर्भ साधनांचे अंतर्गत व बहिर्गत परीक्षण करून त्या आधारे प्रकरणांची मांडणी करण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाची कागदपत्रे, त्याचबरोबर सहकारी संस्थांची इतिवृत्ते, सहकार खात्याकडून प्रसिध्द झालेली माहिती, निरनिराळे आदेश, विविध सहकारी संस्थांचे वार्षिक अहवाल, वृत्तपत्रे, मासिके, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करून हा शोधप्रबंध चिकित्सक पध्दतीने मांडण्यात येणार आहे.

६. प्रकरण आराखडा :—

६.१ प्रकरण पहिले :— सोलापूर जिल्हयाची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी.

सदर प्रकरणामध्ये सोलापूरचे जिल्हयाचे भौगोलिक स्थान, हवामान, पर्जन्यमान, नद्या, जमीन, पिके यांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडातील सोलापूर जिल्हयाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात येणार आहे.

६.२ प्रकरण दुसरे :— सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीचा उदय व विकास (इ.स. १९६० ते इ.स. २०००)

सदर प्रकरणात सोलापूर जिल्हयातील सहकार चळवळीचा उदय आणि विकासाचा अभ्यास करण्यात येणार आहे. १९६० ते २००० या कालखंडात झालेल्या सहकारी चळवळीच्या विकासाचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच काही निवडक सहकारी संस्थांचाही अभ्यास करण्यात येणार आहे.

६.३ प्रकरण तिसरे :— सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीला लाभलेले नेतृत्व.

सदर प्रकरणात सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीला लाभलेल्या स्थानिक नेतृत्वाचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने गणपतराव देशमुख, सुशिलकुमार शिंदे, बबनराव शिंदे, विजयसिंह मोहिते पाटील, सुधकरपंत परिचारक, कि. रा. मर्दा, राजन पाटील — अनगरकर, जयवंतराव जगताप, दिलीप सोपल, इत्यादी स्थानिक नेतृत्वाचा व सहकारी संस्थांच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या राजकारणाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

६.४ प्रकरण चौथे :— सामाजिक व आर्थिक विकासात सहकारी संस्थांची भूमिका.

सदर प्रकरणात सोलापूर जिल्हयातील सहकारी साखर कारखाने, सहकारी दूध संस्था, सहकारी सूतगिरण्या आणि आर्थिक सहकारी संस्था यांनी केलेल्या सामाजिक व आर्थिक विकासाचा अभ्यास करण्यात येणार आहे. जिल्हयातील सहकारी चळवळीमुळे जिल्हयाचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास कशा पध्दतीने झालेला आहे यांचाही आढावा घेण्यात येणार आहे.

६.५ प्रकरण पाचवे :— सहकारी चळवळीच्या विकासातील समस्या किंवा उणीवा.

सदर प्रकरणामध्ये सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीच्या विकासात कोणकोणत्या समस्या किंवा उणीवा आहेत यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. इ.स. १९९० ते इ.स. २००० या कालखंडात जिल्हयातील सहकारी संस्थांची संख्यात्मक वाढ मोठया प्रमाणात झाली. मात्र गुणात्मक वाढ झाली नाही. अनेक संस्था बंद पडल्या तर काही संस्थांना उतरती कळा लागली याची काय कारणे होती यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

६.६ प्रकरण सहावे :— निष्कर्ष / उपसंहार

सदर प्रकरणामध्ये सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीने इ.स. १९६० पासून ते इ.स. २००० पर्यंत जी वाटचाल कली त्या वाटचालीत चळवळीला आलेल्या यशापयशाचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधन आराखडा हा संभाव्य आराखडा असुन संदर्भ साधनांच्या उपलब्धते नुसार प्रकरणाच्या संखेत आणि शिर्षकात कमी अधिक बदल होऊ शकतो.

७. संदर्भ साधने :—

१) Gazetter of Solapur, Bombay presidency Edition 1884.

२) देशमुख गोपाळ; सोलापूर जिल्हयाचा इतिहास, मराठा कालाखंड भाग—१, रेवू प्रकाशन, पंढरपूर प्रथमावृत्ती फेब्रुवारी २००९.

३) जुगळे वसंत; योजना जुगळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : दिशा आणि दशा, प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी १९९६.

४) जोगदंड आनंद (संपा); सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, मर्यादित पुणे, सप्टेंबर २०१४.

५) जोशी सी. जे. ; सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर जून २००५.

६) अवघडे भगवान (संपा); शतकोत्तर सहकार, लोकायन सहकारी प्रकाशन संस्था मर्या. , सातारा, मे २००४.

७) कामत गो. स; सहकार : तत्व आणि व्यवहार, समाज प्रबोधन संस्था, पुणे १९६४.

८) कर्णिक मधु मंगेश (संपा); सांस्कृतिक महाराष्ट्र १९६० ते २०१०, भाग — १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २०११.

९) डॉ. घाणेकर वि.वि. ; सहकारी चळवळीचे शंभर वर्षाचे अवलोकन व नवी आव्हाने, इन्स्टिटुट ऑफ डेव्हलपमेंट ॲन्ड एज्युकेशन, पुणे २००४.

१०) थॉर्नर डॅनियल ; भारतातील सहकारी शेती संघटना, पटवर्धन कुसुम (अनुवादक), समाज प्रबोधन संस्था, पुणे १९६४.

११) डॉ. पाटील जे. एफ व विभुते भालबा (संपा); महाराष्ट्रातील सहकारी अर्थकारण मूल्यमापन व दिशादर्शन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २०११.

१२) फडके य. दि; विसाव्या शतकातील महाराष्ट्र राजकीय इतिहास.

१३) काले कृ. ल. व काले किशोर (संपा) सहकार चळवळ १९०४—२००४ शतक लेखसंग्रह, निर्माण प्रकाशन वर्धा २००५.

१४) भोळे भा. ल; किशोर बेडकिहाळ (संपा), बदलता महाराष्ट्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, २००३.

१५) Dr. Mathur B. S; co-operation in India, Shahitya Bhavan, Aagra, 1977.

१६) Tamalaki S. S; co-operation in India and Abroud, Besal mission press, Mangalor, 1931.

१७) Hajela T. N; Principles, problems and practice of co-operation, Shiva Lal Agarwala and company, Delhi, 1983.

१८) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सोलापूर जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

१९) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर यांचेकडील रेकॉर्ड.

२०) महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एक दृष्टीक्षेप सहकारी आयुक्त व निबंधक – सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, १९९३.

२१) विविध सहकारी संस्थांचे वार्षिक अहवाल.

२२) सहकार खात्याकडून प्रसिध्द झालेली माहिती.

२३) सहकारी महाराष्ट्र, सहकारी जगत, योजना, सहकारी विश्व, लोकराज्य, इत्यादी मासिके.

२४) वृत्तपत्रे.

२५) मुलाखती.

२६) इंटरनेट.

संशोधक विद्यार्थी	मार्गदर्शक
श्री. पांढरे शैलेंद्र विठ्ठलराव	प्रा. डॉ. गंगथडे रमेश दत्तात्रय